# प्रेस नोट दि. ०८.०९.२०२५

**आरोपी लोकसेवक १) श्री. मारुती विलास खोत, वय -४८ वर्षे, व्यवसाय - नोकरी (मंडळ अधिकारी – कवठेमहांकाळ) रा. विठुरायाचीवाडी, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली, वर्ग- ३ आरोपी लोकसेवक २) श्री. संजय किसन हारगे, वय – ४५ वर्षे, , व्यवसाय - नोकरी (महसुल सेवक कवठेमहांकाळ) रा. विठुरायाचीवाडी, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली, वर्ग-४, यांनी तक्रारदार यांचेकडे ३५,०००/- रूपये लाचेची मागणी करून चर्चेअंती २५,०००/- रूपये लाचेची मागणी करुन सापळा कारवाईमध्ये २५,०००/- रुपये लाच रक्कम स्विकारले असता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली विभागाची कारवाई**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **सांगली** |
| **पोलीस स्टेशन** | कवठेमहांकाळ पोलीस ठाणे, जि.सांगली |
| **गुन्हा नोंद क्रमांक व कलम** | गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरू आहे. |
| **तक्रारदार** | पुरुष वय ४६ वर्षे |
| **आरोपी लोकसेवकाचे नांव व कार्यालय** | १)श्री. मारुती विलास खोत, वय-४८ वर्षे, व्यवसाय - नोकरी (मंडळ अधिकारी – कवठेमहांकाळ) रा. विठुरायाचीवाडी, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली, वर्ग- ३<br>२) श्री. संजय किसन हारगे, वय - ४५ वर्षे, , व्यवसाय - नोकरी (महसुल सेवक कवठेमहांकाळ) रा. विठुरायाचीवाडी, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली, वर्ग-४, |
| **पडताळणी कारवाई वेळी मागणी केलेली लाचेची रक्कम व दिनांक** | २५,०००/- (पंचवीस हजार ) रुपये लाचेची मागणी<br>दि.०८.०९.२०२५ रोजी मंडळ अधिकारी कार्यालय कवठेमहांकाळ येथे |
| **सापळा कारवाई वेळी स्विकारलेली लाचेची रक्कम** | २५,०००/- (पंचवीस हजार ) रुपये लाचेची मागणी |
| **सापळा कारवाई दिनांक व ठिकाण** | दि.०८.०९.२०२५ रोजी मंडळ अधिकारी कार्यालय कवठेमहांकाळ येथे |
| **थोडक्यात हकीकत** | यातील तक्रारदार यांचे आईने व त्यांचे शेजारील इतर लोकांनी खरेदी केलेल्या जुने गुंठेवारी जमीनीचे नियमीतीकरण करण्यासाठी तहसिलदार कवठेमहांकाळ यांचेकडे दिलेल्या अर्जाची चौकशी, पंचनामा व जाब जबाब नोंद करुन अभिप्राय देवुन तहसिलदार कवठेमहांकाळ यांना त्रुटीवर आलेला गुंठेवारी नियमीतीकरण प्रस्ताव सादर करण्यासाठी मंडळ अधिकारी श्री मारुती विलास खोत व महसुल सेवक (कोतवाल) श्री संजय किसन हारगे यांनी तक्रारदार यांचेकडे एका प्रस्तावाचे ७,०००/- रुपये प्रमाणे एकुण पाच प्रस्तावांचे ३५,०००/- रुपये असा प्रोटोकॉल करावा लागेल असे म्हणुन ३५,०००/- रुपये लाचेची मागणी केलेबाबतचा अर्ज तक्रारदार यांनी दि.०८.०९.२०२५ रोजी पथकास दिला होता.<br>तक्रारदार यांनी दिले लाच मागणी तक्रारी अर्जाचे अनुषंगाने दि.०८.०९.२०२५ रोजी मंडळ अधिकारी कार्यालय कवठेमहांकाळ येथे पडताळणी केली असता आलोसे क्र. १) मारुती विलास खोत, मंडळ अधिकारी – कवठेमहांकाळ यांनी तक्रारदार यांचे कामा संदर्भात तक्रारदार यांना आलोसे क्र. २) श्री. संजय किसन हारगे, महसुल सेवक कवठेमहांकाळ यांना भेटण्यास सांगीतले. त्याप्रमाणे तक्रारदार आलोसे क्र २) संजय हारगे यांना भेटले असता त्यांनी तक्रारदार यांना त्यांचे आईचे व इतर लोकांचे गुंठेवारी नियमीतीकरण प्रस्तावांची चौकशी मंडळ अधिकारी मारुती खोत यांचेकडून पुर्ण करुन घेवुन तहसिलदार कवठेमहांकाळ यांना अहवाल पाठवण्यासाठी स्वतःकरीता तसेच आलोसे क्र. १ मारुती खोत यांचेकरीता तक्रारदार यांचेकडे प्रथमतः एकुण ३५,०००/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती प्रत्येक प्रस्तावाचे ५,०००/- रुपये प्रमाणे एकुण ५ प्रस्तावाचे २५,०००/- रुपये लाचेची मागणी केली.<br>त्यानंतर दि. ०८.०९.२०२५ रोजीचे सापळा कारवाई वेळी यातील आलोसे क्र २) श्री. संजय किसन हारगे यांनी तक्रारदार यांचेकडून मंडळ अधिकारी कार्यालय कवठेमहांकाळ येथे २५,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे व आलोसे क्र. १) मारुती खोत, मंडळ अधिकारी यांनी आलोसे क्र. २) श्री संजय हारगे यांनी तक्रारदार यांचेकडून स्विकारले लाच रक्कमेस संम्मती देवुन तक्रारदार यांना त्याचे व इतर लोकांचे गुंठेवारी नियमीतीकरण प्रस्ताव चौकशी पुर्ण करुन तहसिलदार कार्यालय कवठेमहांकाळ यांना अहवाल सादर करण्याची हमी दिल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे.<br>त्या अनुषंगाने आलोसे क्र. १) श्री. मारुती विलास खोत, मंडळ अधिकारी - कवठेमहांकाळ वर्ग- ३ व आलोसे क्र. २) श्री. संजय किसन हारगे, महसुल सेवक कवठेमहांकाळ, वर्ग-४ यांचेविरूध्द कवठेमहांकाळ पोलीस ठाणे येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू आहे. |
| **तपास अधिकारी** | श्री. किशोरकुमार खाडे, पोलीस निरीक्षक, ला. प्र. वि. सांगली |
| **मार्गदर्शन अधिकारी** | पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे,<br>अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे |

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| सापळा पथक | श्री अनिल कटके, पोलीस उप अधीक्षक, सांगली, पोलीस निरीक्षक श्री.किशोरकुमार खाडे, योगेश चव्हाण तसेच पोलीस अंमलदार ऋषिकेश बडणीकर, प्रीतम चौगुले, अजित पाटील, धनंजय खाडे, सुदर्शन पाटील, पोपट पाटील, उमेश जाधव, रामहरी वाघमोडे, अतुल मोरे, चंद्रकांत जाधव, सीमा माने, विणा जाधव |

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप व मोबाईल नंबर ९४०४०४१०६४ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

**संपर्क :- १)मोबाईल ॲप -** www.acbmaharashtra.net

**२)फेसबुक पेज -** www.facebook.com-maharashtraACB

**३)वेबसाईट –** www.acbmaharashtra.gov.in

(अनिल कटके)
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली**

Scanned with OKEN Scanner